प्रसिद्धी : दरमहा १५ तारखेस | दि यशवंत बँक फलटणचे मुखपत्र | RNI No. MAHMAR/2010/31891

# यशवंत इन हाऊस

YASHWANT IN HOUSE

• फलटण जि. सातारा. • वर्ष ११ वे • अंकः १२ वा • डिसेंबर २०२१ • पृष्ठ १६ • किंमत : रूपये ५/-

## कोरोना संकटातून व्यवसाय सावरण्यासाठी बँकेने छोट्या उद्योजकांना केले ७ कोटी रूपयांचे कर्ज वितरण


खास मार्गशिर्ष महिन्यानिमित्त

महालक्ष्मी ठेव योजना

१५१ दिवस — ७%

२५१ दिवस — ७.२५%



सलग ९ वर्षे लेखापरिक्षण वर्ग

'अ'

'यशवंत बँकेची सदैव साथ
महालक्ष्मी करेल धनाची बरसात'

योजना मार्गशिर्ष मुहूर्तावर

दि. १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२१

" मार्गशिर्ष महिन्यात महालक्ष्मीची भक्ती खास,
यशवंत बँक देईल, जादा व्याज हमखास " आपली बँक यशवंत बँक...


अंतरंग

| १) मुखपृष्ठ | २) कोरोना जागृती | ३) मनाचे श्लोक | ४) ऊर्जा संरक्षण दिन | ५) किसान दिन | ६) कायदा | ७) कथा | ८) कथा
| ९) प्रशिक्षण वर्ग | १०) पत्रकार दिन | ११/१२) अधिवक्ता दिन | १३) प्रशिक्षण | १४) ठेव योजना | १५) बँक वैशिष्ट्ये | १६) कर्ज योजना



# न घाबरता.. जागरूक राहुया.. सामना करुया..!

## कोरोना व्हायरस

### नॉव्हेल करोना विषाणूने होणाऱ्या कोविड-19 या आजाराची महत्त्वाची लक्षणे :


1. सर्दी, ताप, डोकेदुखी


2. कोरडा खोकला घसा तीव्र दुखणे


3. श्वास घ्यायला त्रास होणे

### आपण करोना विषाणू बाधित व्यक्तीच्या संपर्कात आलो आहे असा संशय असल्यास खालील गोष्टींचा अवलंब करावा :


वारंवार आपले हात साबण व पाणी वापरुन स्वच्छ धुवा.


शिंकताना व खोकताना नाकावर व तोंडावर रुमाल धरा.



ज्या व्यक्तींमध्ये सर्दी, ताप, डोकेदुखी, कोरडा खाकला, घसा तीव्र दुखणे, श्वसनाचा त्रास अशी लक्षणे दिसत असतील त्यांच्या पासून किमान 3 फूट दूर रहा.


विषाणू बाधीत संशयितांनी पुढील 14 दिवसांसाठी सर्व लोकांशी संपर्क टाळा व वेगळ्या खोलीत रहा.


मास्कचा वापर करा.


कुठेही गर्दी करु नका.

**नागरिकांनी घ्यावयाची काळजी.**

- कोरोना विषाणू संसर्ग झाल्याची शंका आली तरी घाबरु नका. त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- कोरोना विषाणूची बाधा झालेला रुग्ण पूर्ण बरा होवू शकतो.
- सार्वजनिक ठिकाणी एकत्र येणे टाळा. अनावश्यक प्रवास टाळावा.
- अफवा आणि चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नका आणि त्या पसरवू नका.


**आपणास वरील लक्षणे दिसून आली तर त्वरीत आपल्या जवळच्या आरोग्य केंद्रामध्ये संपर्क साधा किंवा खालील क्रमांकावर संपर्क साधा :**

**टोल फ्री क्र. : 104**

**राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्र. : 020-26127394**

**राष्ट्रीय कॉल सेंटर क्र. : 011-23978046**





समर्थ रामदास स्वामी रचित

# ॥मनाचे श्लोक॥

समर्थांच्या मते माणसाने दुसऱ्याला उपदेश करण्यापेक्षा स्वतः सुधारावे, स्वतःमध्ये बदल घडवून आणावा आणि इतरांना मदत करावी. जीवन आनंदाने कसे जगावे आणि सर्वांशी प्रेमाने कसे वागावे याची कला शिकविणारा ग्रंथ म्हणजे मनाचे श्लोक होय. समर्थ रामदास रचित

"मनाचे श्लोक" अर्थासहित मालिका – भाग १५

*जय जय रघुवीर समर्थ ।*

श्लोक क्र. ७६

नव्हे कर्म ना धर्म ना योग कांहीं।
नव्हे त्याग ना भोग ना सांग ना पाहीं।
म्हणे दास विश्वास नामीं धरावा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।

जीवनामध्ये कर्ममार्गाचे आचरण होत नाही,धर्माचे पालन होत नाही, योग-साधनाही घडत नाही. खरेतर भोगही घडत नाहीत आणि त्यागही घडत नाही. म्हणून रामनामावर मानसाने विश्वास ठेवावा व पहाटेच्या वेळी रामाचे चिंतन करावे.

श्लोक क्र. ७७

करी काम निःकाम या राघवाचें।
करी रूप स्वरूप सर्वां जिवांचे।
करीं छेद निर्व्दंव्द हे गूण गातां।
हरीकीर्तनीं वृत्तिविश्वास होतां।।

भगवंताबद्दल आसक्ती निर्माण झाली की मनुष्य विरक्त बनू लागतो. तो निष्काम कर्म करू लागतो.सर्व जीव हे ब्रम्हस्वरूप असल्याचे ज्याला ज्ञान होते. तो मनुष्य भगवंताचे गुनगान करू लागला की भेदभाव नाहीसे होतात व सुख-दुःख या द्वंद्वांच्या पलीकडे पोहोचतो. भगवंतांच्या कीर्तनामध्ये विश्वास जडला की असे घडते.

श्लोक क्र. ७८

अहो ज्या नरा रामविश्वास नाही।
तया पामरा बाधिजे सर्व काही।
महाराज तो स्वामि कैवल्यदाता।
वृथा वाहणें देहसंसारचिंता।।

ज्या मनुष्याला रामाबद्दल विश्वास वाटत नाही,त्या बिचाऱ्याला सर्व दुःखे भोगावी लागतात. प्रभू राम हा त्रैलोक्याचा स्वामी आहे,तोच मोक्षदाता आहे. म्हणून देहाची व संसाराची काळजी करणे व्यर्थ होय.

श्लोक क्र. ७९

मना पावना भावना राघवाची।
धरी अंतरीं सोडिं चिंता भवाची।
भवाची जिवा मानवा भूलि ठली।
नसे वस्तुची धारणा व्यर्थ गेली।।

हे मना, भगवंताबद्दलची भक्ति-भावना ही पवित्र करणारी आहे.ती मनात बाळग आणि संसाराची चिंता करणे सोडून दे. माणसाच्या मनाला संसाराची भुरळ पडते व तो त्याला खरा मानू लागतो. पण जो संसार खरा नाही, तो मनात धरून ठेवला तर फसगत होणारच.

श्लोक क्र. ८०

धरा श्रीवरा त्या हरा अंतरातें।
तरा दुस्तरा त्या परा सागरातें।
सदा विसरा त्या भरा दुर्भरातें।
करा नीकरा त्या खरा मछरातें।।

भगवान शंकराने ज्या श्रीहरीला आपल्या ह्रदयात धारण केले आहे, त्या श्रीहरीला आपल्या मनामध्ये विराजमान करा,
म्हणजे हा कठीण असा भवसागर पार करता येईल.
पोट पूर्णपणे भरणे, लौकिक गरजा पूर्ण करणे, हे महाकठीण कर्म आहे.
ते नेहमी विसरायला शिकावे आणि मस्तराचा निकराने नाश करावा.



# १४ डिसेंबर - राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण दिन

१४ डिसेंबर हा दिवस 'राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण दिन' म्हणून साजरा केला जातो.

भारतात राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिवस माणसाच्या दैनंदिन जीवनातील ऊर्जेचे महत्त्व जाणून तसेच कमी ऊर्जा वापर, अधिक ऊर्जा बचत किंवा संरक्षण करण्यास जागरुक करण्यासाठी साजरा केला जातो.

उर्जेचे अनावश्यक वापर टाळून ऊर्जा संवर्धन करण्याची गरज आहे. भविष्यातील वापरासाठी ती जतन करणे तसेच उपलब्ध उर्जा कार्यक्षमतेने वापरणे अतिशय आवश्यक आहे. ऊर्जा संवर्धन योजनेत अधिक परिणाम मिळवण्यासाठी प्रत्येक साधनाच्या वापरात ऊर्जा संवर्धनाची नाळ रुजलेली असावी. अनावश्यकपणे चालणारे पंखे, लाइट, हीटर, रोजच्या वापरातील कार टेप किंवा इतर इलेक्ट्रीक वस्तूंना जोडतांना ही काळजी घेवून ऊर्जा वाचवू शकतो. ऊर्जेचा अतिरिक्त वापर वाचवण्याकरता ही अधिक सोपी व कार्यक्षम पद्धत आहे. ज्यामुळे आपण राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन मोहिमेत मोठी भूमिका बजावू शकतो.



## माहे डिसेंबर दिनविशेष

०१ डिसेंबर – एड्स प्रतिबंधक दिन
०२ डिसेंबर – जागतिक संगणक साक्षरता दिन
०३ डिसेंबर – जागतिक अपंगदिन
०४ डिसेंबर – भारतीय नौसेना दिवस
०६ डिसेंबर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन
०९ डिसेंबर – आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचारविरोधी दिन
१० डिसेंबर – मानवी हक्क दिन
१४ डिसेंबर – उर्जा संरक्षण दिन
२२ डिसेंबर – राष्ट्रीय गणित दिवस, सुर्याच्या उत्तरयाणास प्रारंभ, उत्तर गोलार्धात वर्षातील सर्वात लहान दिवस
२३ डिसेंबर – भारतीय किसान दिन
२४ डिसेंबर – राष्ट्रीय ग्राहक दिन
२५ डिसेंबर – ख्रिसमस डे– येशू ख्रिस्तांचा जन्मदिन



# २३ डिसेंबर - राष्ट्रीय किसान दिन

भारत हा शेतीप्रधान देश आहे. तसेच 'शेती' हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकरी शेती पिकवून संपूर्ण देशातील जनतेची भूक भागवतो. भारताचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरण सिंग यांचा वाढदिवस (२३ डिसेंबर) 'राष्ट्रीय शेतकरी दिन' म्हणून साजरा केला जातो.

देशातील शेतकऱ्यांच्या हितासाठी चौधरी चरण सिंह यांनी भरीव कामगिरी केली आहे. चरण सिंग यांनी राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेची (नाबार्ड) स्थापना केली. अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये २००१ साली चौधरी चरण सिंह यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय शेतकरी दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. भारत महासत्ता होणार असल्याचा आशावाद व्यक्त होतो. मात्र, दुसरीकडे राज्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. देशात राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा होतो. परंतु, याच राज्यात सध्या शेतकरी सुविधांपासून वंचित आहे. तसेच अलिकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्येतही वाढ होत आहे.

शेतकऱ्याला सन्मानाने 'बळीराजा' म्हटले जाते. परंतु, प्रत्यक्षात हा राजा अतिशय दीनदुबळा झालेला आपल्याला सध्या पाहायला मिळतो आहे. कर्जबाजारीपणा, वाढती व्यसनाधीनता, अंधश्रद्धा आणि आर्थिक विवंचना या आपत्तींचा बळी शेतकरी ठरलेला आहे. प्रत्येक भारतीयाने समाजातील प्रत्येक घटकाने शेतकऱ्यांप्रती किमान कृतज्ञतेची भावना ठेवणे गरजेचे आहे.

सध्या शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. नैसर्गिक आपत्ती असेल किंवा राजकीय निष्क्रियता यामुळे राज्यात शेतकऱ्यांमध्ये आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढत आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या हा पर्याय निवडला. परंतु, आत्महत्या हा शेवटचा पर्याय नाही हे शेतकऱ्यांनी समजून घ्यायला हवं. यासाठी सरकारनेदेखील प्रयत्न करणं आवश्यक आहे. सरकारने शेतीमालाला योग्य हमीभाव देणं, शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवणं गरजेचं आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना जीवन जगणं सोप होईल आणि स्वत: चा विकास करण्यास चालना मिळेल. आज राष्ट्रीय शेतकरी दिनाचे औचित्य साधून शेतकऱ्यांना शेतकरी दिवसाच्या शुभेच्छा नक्की द्या. जेणे करून त्यांनाही शेतकरी असण्याचा अभिमान वाटेल.

★ ★ ★





# सहकार कायदा - १९६० आणि सिक्युरिटायझेशन कायदा - २००२

**सहकारी बँका कर्जाच्या वसुलीसाठी सहकार कायदा – १९६० आणि सिक्युरिटायझेशन कायदा – २००२ अन्वये एकाचवेळी वसुली कारवाई करू शकतात का ?**

सिक्युरिटायझेशन कायद्यामध्ये वसुलीकरिता योजून दिलेल्या उपाययोजना किंवा तरतुदी ह्या तारण मिळकती पुरत्याच मर्यादित असतात. तसेच सहकार कायद्यातील कर्ज वसुलसाठी तरतुदी या तारण मिळकतीस लागू होतातच शिवाय कर्जदार, जामीनदारांच्या विरूध्द वैयक्तिक व संयुक्तिकरित्या वसुलीसाठी उपयुक्त ठरतात. यावरून हे स्पष्ट होते कि, सिक्युरिटायझेशन कायदा आणि महाराष्ट्र राज्य सहकारकायदा या दोहोंचे उद्दिष्ट समान आहे. म्हणजेच बँकांच्या कर्जाची वसुली करणे हेच समान उद्दिष्ट असल्याने सदरील कायदे हे एकमेकांस छेद देणारे नसून प्रत्यक्षात एकमेकांस पूरकच आहेत.

आशा ऑइल फूड्स लि. विरूध्द दि जळगाव जनता सहकारी बँक लि, – २००५ (४) बीसी २९, मध्ये निकाल देताना मेहेरबान उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, सहकार कायदा कलम १०१ अंतर्गत पारित झालेला वसुली दाखला हा सिक्युरिटायझेशन कायदा कलम १३ मधील तरतुदीची पायमल्ली करणारा नाही. सदर निकालात कोर्टाने असेही नमूद केलेले आहे की सहकार कायदा आणि सिक्युरिटीयझेशन कायदा या दोन्ही कायद्याखाली एकाच वेळीस कारवाई केल्याने कोणत्याही कर्जदारास त्यांच्या हक्कांस बाधा आली असे म्हणण्याचे काहीही कारण नाही.

ट्रान्सकोर विरूध्द युनियन ऑफ इंडिया एआयआर २००७, सुप्रिम कोर्ट ७१२ या दाव्यामध्ये निकाल देताना मेहेरबान उच्च न्यायालयाने स्पष्ट केलेले आहे की, सिक्युरिटायझेशन कायदा २००२ आणि डी आर टी कायदा या दोन्हीही कायद्यांतर्गत एकाच वेळी कारवाई करता येते. तसेच या निकालात नमूद केलेल्या तत्वानुसार अनेक उच्च न्यायालयांनी देखील वेळोवेळी नमूद केलेले आहे की, कर्ज वसुलीसाठी सिक्युरिटायझेशन कायदा २००२ आणि इतर कायद्यातील म्हणजेच महाराष्ट्र राज्य सहकार कायदा १९६० अंतर्गत बँकांना एकाच वेळी कारवाई करण्यास कोणतीही मनाई नसून, उलटपक्षी सहकारी बँकांना कर्ज वसुलीसाठी सहकार कायदा आणि सिक्युरिटायझेशन कायदा या कायद्यांतर्गत एकाच वेळी कारवाई करता येते.

थोडक्यात सहकार कायदा आणि सिक्युरिटायझेशन कायदा या दोन्ही कायद्यांचे उद्दिष्ट समान असून त्यातील तरतुदी एकमेकांस छेद देणाऱ्या नसून वास्तविक पाहता पूरक आहेत. अशा परिस्थितीत सहकारी बँका सदरील दोन्हीही कायद्याअंतर्गत एकाच वेळी कारवाई सुरू करू शकतात.



# वास्तुशास्त्र आणि विचार

एका व्यक्तीने व्यवसायात प्रगती करून लंडन मध्ये जमीन विकत घेतली आणि त्यावर आलिशान घर बांधले. त्या जमिनीवर आधीच एक सुंदर जलतरण तलाव होता आणि मागे १०० वर्ष जुने लिचीचे झाड होते. त्या लिचीच्या झाडामुळेच त्यांनी ती जमीन विकत घेतली होती, कारण त्यांच्या पत्नीला लिची खूप आवडत होती. काही काळानंतर घराचे नुतनीकरण करावे असे त्यांना वाटू लागले. त्यांच्या काही मित्रांनी त्यांना नूतनीकरणाच्या वेळी सल्ला दिला की त्यांनी वास्तुशास्त्र तज्ञाचा सल्ला घ्यावा. त्यांचा अशा गोष्टींवर फारसा विश्वास नसला तरी, मित्रांचे मन राखण्याचे त्याने मान्य केले आणि ३० वर्षांपासून हाँगकाँग येथील वास्तुशास्त्राचे प्रसिद्ध मास्टर काओ यांना बोलावले.



काओंना विमानतळावरून नेले, दोघांनी शहरात जेवण केले आणि त्यानंतर ते त्यांना त्यांच्या कारमध्ये घेऊन त्यांच्या घराकडे निघाले. वाटेत जेव्हा एखादी गाडी त्याला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करत असे तेव्हा तो त्याला रस्ता देत असे. मास्टर काओ हसले आणि म्हणाले की तुम्ही खूप सुरक्षित ड्रायव्हिंग करता. ते देखील हसले आणि प्रतिसादात म्हणाले की लोक सहसा काही आवश्यक काम असतानाच ओव्हरटेक करतात, म्हणून आपण त्यांना मार्ग दिला पाहिजे.

घराजवळ पोहोचल्यावर रस्ता थोडा अरुंद झाला आणि त्याने गाडीचा वेग बराच कमी केला. तेवढ्यात अचानक एक मुल रस्त्यापलिकडून हसत हसत आणि वेगाने धावत त्यांच्या गाडीच्या समोरून रस्ता ओलांडून गेले. त्याच वेगाने चालत असताना तो मात्र त्या रस्त्याकडे पाहतच राहिला, जणू कोणाची तरी वाट पाहत होता. तेवढ्यात त्याच रस्त्यावरून अचानक आणखी एक मूल पुढे आलं. त्यांच्या कारच्या पुढून पळत गेले, बहुधा पहिल्याचा पाठलाग करत असावे. मास्टर काओने आश्चर्याने विचारले – दुसरे मूलही धावत बाहेर येईल हे तुला कसे कळले?

ते मोठ्या सहजतेने म्हणाले, मुले अनेकदा एकमेकांच्या आगे मागे धावत असतात आणि कोणतेही मूल जोडीदाराशिवाय असे धावत असते यावर विश्वास बसत नाही. मास्टर काओ हे ऐकून मोठ्याने हसले आणि म्हणाले की तुम्ही निःसंशयपणे खूप स्थिर चित्त व्यक्ती आहात. घराजवळ आल्यानंतर दोघेही गाडीतून खाली उतरले. तेवढ्यात अचानक घराच्या मागच्या बाजूने ७-८ पक्षी वेगाने उडताना दिसले. हे पाहून तो मालक मास्टर काओला म्हणाला की, जर तुमची हरकत नसेल तर आपण इथे थोडा वेळ राहू शकतो का? मास्टर काओ यांना कारण जाणून घ्यायचे होते. त्यावर ते गृहस्थ म्हणाले की, कदाचित काही मुले झाडावरून लिची चोरत असतील आणि आमच्या अचानक येण्याने मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होईल, तर झाडावरून पडून मुलाला दुखापतही होऊ शकते. मास्टर काओ काही वेळ गप्प बसले, मग ते संयत आवाजात म्हणाले, या घराला वास्तुशास्त्राच्या तपासाची आणि उपायांची गरज नाही.त्या गृहस्थाने मोठ्या आश्चर्याने विचारले – का?

मास्टर काओ – जिथे तुमच्यासारखे विवेकी आणि आजूबाजूच्या लोकांचा चांगला विचार करणारे लोक उपस्थित रहात असतील – ते ठिकाण, ती मालमत्ता वास्तुशास्त्राच्या नियमांनुसार अतिशय पवित्र-आनंददायी-फलदायी असेल. मित्रांनो, आपले तन आणि मन जेव्हा इतरांच्या सुख-शांतीला प्राधान्य देऊ लागते तेव्हा, इतरांनाच नव्हे तर आपल्यालाही मानसिक शांती व आनंद मिळतो. जेव्हा माणूस नेहमी स्वतःच्या आधी इतरांच्या भल्याचा विचार करू लागतो, तेव्हा नकळत त्याला संतत्व प्राप्त होते, ज्यामुळे इतरांचे भले होते आणि त्याला ज्ञान प्राप्त होते. आपणही असे गुण विकसित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे म्हणजे आपल्या घराला फेंगशुई किंवा वास्तूसारख्या तंत्राची किंवा नवस बोलण्याची गरज भासणार नाही. ★★



# गाय दूध देत नाही



रामधन एक कष्टाळू शेतकरी होता. वडिलोपार्जित एक एकर जमिनीची, त्याने पाच एकर जमीन केली. फक्त शेतीवरच अवलंबून न रहाता गायी, म्हशी, कोंबड्या पण पाळलेल्या होत्या. त्यांच्यापासूनही त्याला अतिरिक्त कमाई होती. प्रामाणिक वृत्ती, सोबत मालतीची, त्याच्या पत्नीची प्रत्येक कामात पूर्ण साथ, यामुळे घरही नेहमी आनंदी भासे. मुलांवर सुसंस्कार होत होते. त्याला दोन मुलं आणि एक मुलगी. एक दिवस तो म्हणाला, तुम्ही १४ वर्षांचे झाला की, मी तुम्हाला जीवनाचं सत्य सांगेन. यशस्वी जीवनाचा मंत्र सांगेन. मोठा सुजित १४ वर्षांचा झाला. वाढदिवसाचं औक्षण झालं. त्याने विचारलं, बाबा सांगा मला जीवनाचं सत्य, यशाचा मंत्र. रामधन त्याला शेतात घेऊन गेला. गायीजवळ उभा राहिला आणि म्हणाला, जीवनाचं मोठं सत्य सांगतो, ते समजून घे. गाय दूध देत नाही. हे जीवनाचं मोठं सत्य आहे. सुजीत आश्चर्याने पहातच राहिला, म्हणाला, बाबा तुम्ही काय सांगताय? आपली गाय तर रोजच दूध देते. हे तर खोटं बोलताय तुम्ही आणि यात यशाचा मंत्र तर अजिबातच दिसत नाही. रामधन म्हणाला, होय, गाय दूध देत नाही, दूध आपण काढलं तरच मिळतं. गाय पाळल्यावर तिची योग्य निगा घ्यावी लागते. चारापाणी व्यवस्थित करावा लागतो. वासरू झाल्यावर त्याचीही काळजी घ्यावी लागते. दूध काढण्यासाठी सकाळीच चार वाजता उठावं लागतं. शेतात यावं लागतं. गोठ्यातलं रात्रभर जमा झालेलं शेण साफ करावं लागतं. चारा टाकावा लागतो गायीजवळ वासराला आणायचं पान्हा फुटला की हळूच त्याला दूर करायचं त्यामुळे तिने मारू नये म्हणून पाय बांधायचे, शेपटी बांधायची. तरी ती आपोआप दूध देत नाही दूध काढावं लागतं मगच ते आपल्याला मिळतं म्हणजेच आपल्याला विना मेहनतीचं गाय दूध देत नाही, ते आपल्यालाच काढावं लागतं. आताची ही तुमची नवी पिढी तुम्हाला वाटतं गाय दूध देते प्रत्येक गोष्ट सहजच मिळते, मनात इच्छा झाली की! पण दूध काढावं लागतं. कोणतीही गोष्ट मिळवण्यासाठी कष्ट करावे लागतात, हे तुमची पिढी विसरतेय.इच्छा करा. मागा की, वस्तु समोर हजर, ही तुमची वृत्ती झाली आहे. कोणतीही गोष्ट मनात आली, आईबाबाला सांगितलं की, लगेच मिळते तुम्हाला, तशी सवयच झाली आहे. तू लहान आहेस, तोपर्यंत तुझ्या गरजा पुरवणं आमचं कर्तव्यच आहे. आज तू १४ वर्षांचा झालास सगळं आपोआप मिळत नसतं, याची जाणीव करून देणं, हेही आमचं कर्तव्यच आतापर्यंत सहज मिळणाऱ्या गोष्टींमागेही कष्ट करावे लागतात, त्या आपोआप इच्छा केली की मिळत नाहीत, हेही तुला समजणं गरजेचंच आहे! तुला चांगलं शिक्षण, पदवी पाहिजे, तर तुला जीव तोडून अभ्यास करावा लागेल. तुला यश, समृद्धी, पैसा पाहिजे, तर हुशारीने मेहनत करावी लागेल. तुला नाव, प्रसिद्धी पाहिजे असेल, तर समाजासाठी काही करावं लागेल.

इतकंच नाही, तर तुझ्या आजूबाजूची माणसं, तुझा परिवार आनंदी, हसरा हवा असेल तर तोही आपोआप मिळणार नाही, त्यासाठी तुला आधी प्रेमळ आणि हसतमुख रहावं लागेल. कोणतीही गोष्ट आपोआप, इच्छा केली की मिळत नसते.

त्यासाठी परिश्रम हे घ्यावेच लागतात. आणि आयतं, आपोआप मिळालेलं तकलादू असतं, टिकत नसतं. सातत्य नसलं की वाढत नसतं म्हणून गाय दूध देत नाही, ते काढावं लागतं. हे जीवनाचं महत्वाचं सत्य माहित असणं जरूरी! हुशारीने केलेलं नियोजन, परिश्रम, सातत्य आणि प्रयत्न हाच यशाचा मंत्र हेही माहित असणं आवश्यक आहे..!

★ ★ ★



# सेवक प्रशिक्षण वर्ग

आपल्या यशवंत बँकेतील मुख्य कार्यालयासह फलटण, कराड व सातारा येथील सर्व सेवकांचा प्रशिक्षण वर्ग रविवार, दिनांक १४ नोहेंबर २०२१ रोजी श्रीकृष्ण सृष्टी, विंग, ता.कराड येथे संपन्न झाला. प्रशिक्षण वर्गास बँकेचे सर्व सेवक १०० टक्के पूर्णवेळ उपस्थित होते.

प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन बँकेचे अध्यक्ष मा.शेखर चरेगांवकर यांच्या हस्ते झाले. दोन विशेष सत्रांच्या माध्यमातून मा.चरेगांवकर साहेबांनी सर्व सेवकांना मार्गदर्शन केले. संगणक विभागाचे व्यवस्थापक श्री.रोहित साने यांनीही सीबीस मधील काही बदलांची माहिती व प्रशिक्षण उपस्थितांना दिले.

मार्च २०२२ ला २५ कोटी ठेव वाढीचा संकल्प व निर्धार यावेळी सर्व सेवकांनी केला. प्रशिक्षण वर्गाचे संचालन सहाय्यक महाव्यवस्थापक श्री.रुपेश कुंभार यांनी केले. आभार मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.वैशाली मोकाशी यांनी मानले.








# राष्ट्रीय पत्रकार दिन

१६ नोव्हेंबर हा दिवस देशभर 'राष्ट्रीय पत्रकार दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. बँकेच्या फलटण, कराड व सातारा या तिन्ही शाखांत स्थानिक पत्रकार बंधू – भगिनींना आमंत्रित करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी दैनिक कर्मयोगीचे महेश सूर्यवंशी, दि न्यूज लाईनचे अमोल टकले, यशवंतनगरी न्यूज चॅनेलचे विकास भोसले, दैनिक पुण्यनगरी कराडचे गोडसे, फलटणचे यशवंत खलाटे, दैनिक पुढारीचे अकबर शेख, दैनिक सामनाचे गोरख तावरे, ज्येष्ठ पत्रकार, बँकेचे फलटण शाखा सल्लागार ऐक्यचे अरविंदभाई मेहता, सकाळचे हेमंत पवार, वेध माझाचे अजिंक्य गोवेकर, दैनिक तरुण भारत साताराच्या गौरी आवळे तसेच साम मराठी टीव्ही न्यूजचे ओंकार कदम यांचा पुष्पगुच्छ व पुस्तक भेट देवून सन्मान करण्यात आला.

















# राष्ट्रीय अधिवक्ता दिन

३ डिसेंबर हा दिवस देशभर ‘राष्ट्रीय अधिवक्ता दिन’ म्हणून साजरा करण्यात येतो. देशाचे प्रथम राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांचा हा जन्मदिवस. यानिमित्ताने बँकेच्या फलटण, कराड व सातारा या तिन्ही शाखांत स्थानिक वकील मान्यवर बंधू - भगिनींना आमंत्रित करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी कराड येथे बँकेचे तज्ञ संचालक ॲड.विशाल शेजवळ, ॲड. पृथ्वीराज कदम, ॲड.अमित लाड, ॲड. नंदकुमार देशमुख, ॲड.आनंद कुलकर्णी, पुणे फलटण येथे ॲड.अशोक जाधव, ॲड.प्राजक्ता कांबळे, ॲड.रामकृष्ण धुमाळ, सातारा येथे ॲड.गिरीश कुलकर्णी, ॲड.प्रमोद बाबर, ॲड.अद्वैत देवधर यांचा सन्मान करण्यात आला.











# राष्ट्रीय अधिवक्ता दिन











# आग विरोधक उपकरण प्रशिक्षण

आपल्या यशवंत बँकेत मुख्य कार्यालयासह सर्व शाखांमध्ये आग विरोधक उपकरण बसवण्यात आली आहेत. संकटकाळी आग विझवण्यासाठी याचा उपयोग केला जातो. मात्र त्यापूर्वी हे उपकरण हाताळण्याचे प्रशिक्षण बँकेतील सर्व सेवकांना असणे गरजेचे आहे. यासाठी बँकेच्या सेवक प्रशिक्षणा दिवशी प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून आग लागल्यानंतर या फायर सिलेंडरचा वापर करून आग कशी विझवावी याचे प्रशिक्षण (Fire Fighting Mock Drill) मे. प्रकाश फायर सर्व्हिसेस, कराड यांचे वतीने प्रशिक्षक श्री.राजेंद्र थोरात यांनी सर्वांना दिले.









# * आवाहन संकल्पपूर्तीचे *

## संकल्प २५
## कोटी ठेव संकलनाचा



**आपली गुंतवणूक यशवंत बँकेत करून या संकल्पपूर्तीत सहभागी व्हावे, ही विनंती.**

**आपली गुंतवणूक सुरक्षितता केवळ बँकेतच !**

आपली बँक, यशवंत बँक..!

| तपशील | ३१ मार्च २०२० | ३१ मार्च २०२१ |
|---|---|---|
| ठेवी | १६३ कोटी | १८९ कोटी |
| कर्जे | १२५ कोटी | १४४ कोटी |
| भांडवल पर्याप्तता (CRAR)–आदर्श प्रमाण ९ % | १२.८७% | १२.५७% |
| लेखापरीक्षण – सलग ९ वर्षे 'अ' वर्ग | 'अ' | 'अ' |



'बँकेतील आपला प्रत्येक रूपया सुरक्षित, कारण कुटुंबातील प्रत्येकाला आहे आता रूपये ५ लाखांचे ठेव विमा संरक्षण.'

मा. शेखर चरेगांवकर
अध्यक्ष, दि यशवंत बँक लि., फलटण

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेस भेट द्या.

**दि यशवंत को–ऑप. बँक लि., फलटण**

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com admin@yashwantbank.com

---

## संकल्प २५ कोटी ठेव संकलनाचा
अभियानाअंतर्गत
**पतसंस्थांसाठी खास, जादा लाभाची ठेव योजना**

### यशवंत 5 प्लस

व्याजदर ८.५०%

गुंतवणूक प्रती संस्था फक्त रू.५ लाख

मुदत १५ महिने

योजना ३१ डिसेंबर २०२१ पर्यंतच मर्यादित.

'बँकेतील आपला प्रत्येक रूपया सुरक्षित, कारण इथे प्रत्येक व्यक्ती व संस्थेला आहे. आता रूपये ५ लाखांचे विमा संरक्षण, आपणही आपल्या संस्थेची गुंतवणूक, यशवंत बँकेत करून या संकल्पपूर्तीत सहभागी वहावे, ही विनंती.'



शेखर चरेगांवकर
अध्यक्ष, यशवंत बँक

**Bank Details For NEFT / RTGS**

Benificery Name - The Yashwant Co-Op Bank Ltd., Phaltan
Bank Name - HDFC Bank Ltd.
Branch - Phaltan
IFSC Code - HDFC0002104
Account No. - 21040380000010

९ वर्षे सातत्याने ऑडीट वर्ग 'अ' असणारी आपली बँक, यशवंत बँक.

**दि यशवंत को–ऑप. बँक लि., फलटण**

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| ☎ (०२१६६) २२०५२० | ☎ (०२१६४) २२७४६७ | ☎ (०२१६२) २२९४६७ |
| मोबा. ८४०८८०२०२२ | मोबा. ७८७५५५८४९१ | मोबा. ९०४९६३३५५५ |

Email : yashwantbankkarad.com Website : yashwantbankkarad.com

---

## स्वराज्य ७५ संजीवनी ठेव योजना

**लसीकरण झालेल्या नागरीकांसाठी खास योजना**

१३ महिने मुदतीसाठी

| | व्याजदर |
|---|---|
| १ लस घेतलेल्या नागरीकांसाठी | ८.२५% (द.सा.द.शे) |
| २ लस घेतलेल्या नागरीकांसाठी | ८.५०% (द.सा.द.शे) |
| लस न घेतलेल्या नागरीकांसाठी | ८.००% (द.सा.द.शे) |

**दि यशवंत को–ऑप. बँक लि., फलटण**

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| ☎ (०२१६६) २२०५२० | ☎ (०२१६४) २२७४६७ | ☎ (०२१६२) २२९४६७ |
| मोबा. ८४०८८०२०२२ | मोबा. ७८७५५५८४९१ | मोबा. ९०४९६३३५५५ |



# बँक वैशिष्ट्ये - ठेवीचे व कर्जाचे व्याजदर

## दि यशवंत को-ऑप बँक लि; फलटण

### बँकेची वैशिष्टे

- बँक असल्याने प्रत्येक ठेवीदारास रू. ५ लाखांचे ठेव विमा संरक्षण...
- सर्वांत कमी सुट्या असणारी सहकारी बँक...
- सर्व शाखांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत कॅश सुविधा देणारी बँक
- कोरोना विषाणू काळातही कॅश देण्यावर कोणतीही मर्यादा नाही...
- बचत गटांना केवळ अर्थसहाय्य नव्हे तर प्रशिक्षण देणारी बँक...
- राष्ट्रीय महिला कोषकडून निधी घेणारी राज्यातील पहिली बँक...
- रिकरिंग ठेव (R.D) खात्यावर मिळणाऱ्या रकमेइतके अपघाती विमा संरक्षण देणारी एकमेव बँक...
- मधुमित्र ठेव योजनेत डायबेटिक ग्राहकांना दरमहा मोफत तपासणी...
- ग्रीन फ्युचर ठेव योजनेत ७५० वृक्षांची लागवड व यशस्वी संगोपन...
- यशवंत महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम सलग १० वर्षे संपन्न...
- बँकेचे तज्ञ व निस्वार्थी संचालक मंडळ...
- व्यवस्थापन खर्च अत्यंत अल्प प्रमाणात ठेवणारी बँक...
- सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम...
- प्रत्येक नैसर्गिक आपत्तीत अग्रेसर होवून मदत कार्य करणारी बँक...

* ग्राहक सेवा हा आमचा विभाग नसून स्वभावच आहे. *

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेस भेट द्या.

**दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण**

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com admin@yashwantbank.com

## दि यशवंत को-ऑप बँक लि; फलटण

### दि. ०१/१२/२०२१ पासूनचे ठेवीवरील सुधारीत व्याजदर

| अ.नं. | ठेव प्रकार | मुदत | सुधारित व्याजदर |
|---|---|---|---|
| १ | सेव्हिंग्ज ठेव | | ३.५० % |
| २ | स्पेशल सेव्हिंग्ज् ठेव | | ६.५० % |
| ३ | चिरंजिव सेव्हिंग्ज् ठेव | | ३.५० % |
| ४ | पिग्मी ठेव | | ३.०० % |
| ५ | सुपर फ्लेक्सी ठेव | | ५.०० % |
| ६ | अल्प मुदत | किमान १६ दिवस ते ९० दिवस | ५.५० % |
| ७ | अल्प मुदत | ९१ दिवस ते १८० दिवस | ५.७५ % |
| ८ | अल्प मुदत | १८१ दिवस ते ३६४ दिवस | ६.०० % |
| ९ | मध्यम मुदत | १ वर्ष | ७.२५ % |
| १० | मध्यम मुदत | १३ महिने ते २४ महिने | ७.७५ % |
| ११ | मध्यम मुदत | २५ महिने ते ६० महिने | ८.०० % |
| १२ | मासीक व्याज योजना | ३ वर्षे व पुढे | ८.२५ % |
| १३ | मधुमित्र योजना | ३ वर्षे व पुढे | ८.२५ % |
| १४ | आधार (जेष्ठ नागरीक) | ३ ते ५ वर्षे | ८.५० % |
| १५ | दामदुप्पट ठेव | | ८ वर्षे |
| १६ | दामदिडपट ठेव योजना | | ४ वर्षे २ महिने |

रिकरिंग ठेव प्रकारामध्ये व्याजदर पूर्वीप्रमाणेच राहतील.

'अ' वर्ग सभासद किंवा जेष्ठ नागरीक यांना १ वर्ष व त्यापुढील कालावधीकरीताच्या ठेवींना ०.२५ टक्के जादा व्याजदर

आपली बँक, यशवंत बँक.

## दि यशवंत को-ऑप बँक लि; फलटण

फलटण-कराड-सातारा

बँकेच्या नव्या सभासदांसाठी खास आरोग्यदायी ठेव योजना

### * सभासद आरोग्यवर्धिनी योजना *

सुरक्षितता... ठेवींबरोबर आरोग्याचीही..

| सभासद आरोग्यवर्धिनी - फेज १ | दरमहा रू. १००/- शेअर्स किंवा एकरकमी दरवर्षी रू. १०००/- चे शेअर्स |
|---|---|
| लॅबोरेटरी चार्जेस :- | |
| १) रक्त तपासणी (वर्षात कमाल मर्यादा रू. २००/-) | रू. १००/- |
| २) लघवी तपासणी (वर्षात कमाल मर्यादा रू.२००/-) | रू. १००/- |
| एक्स रे (वर्षातून एकदाच) | रू. १५०/- |
| कार्डीओग्राम (वर्षातून एकदाच) | रू. २००/- |
| डोळे तपासणी (वर्षातून एकदाच) | रू. १५०/- |
| डोळ्यांचे ऑपरेशन | रू. ५००/- |
| चष्मा खरेदी (एकदाच) | रू. २००/- |
| सोनोग्राफी (वर्षातून एकदाच) | रू. ३५०/- |
| सी.टी.स्कॅन (वर्षातून एकदाच) | रू. ५००/- |
| अंत्यविधी अनुदान | रू. १०००/- |

## कर्जावरील व्याज दर

| अ. नं. | कर्ज प्रकार | दि. ०१/०१/२०१७ पासून बदलेले सुधारित व्याजदर |
|---|---|---|
| १ | सामान्य कर्ज (जामीनकी तारण) | १६.००% |
| २ | स्थावर तारण कर्ज | १६.००% |
| ३ | हायपोथिकेशन कर्ज (जुने वाहन/मशिनरी) | १६.००% |
| ४ | हायपो. कॅश क्रेडीट कर्ज | १६.००% |
| ५ | यशवंत महिला स्वयंरोजगार कर्ज | १५.५०% |
| ६ | सोनेतारण | मुल्यांकनाच्या ५०% - १२%<br>मुल्यांकनाच्या ७५% - १४%<br>मुल्यांकनाच्या १००% - १६% |
| ७ | वाहनतारण कर्ज - मुदत ७ वर्षापर्यंत<br>वैयक्तिक वापराच्या वाहनाकरीता<br>व्यावसायिक वाहनाकरीता | <br>१२.००%<br>१३.००% |
| ८ | गृहबांधणी कर्ज मुदत १५ वर्षापर्यंत | १२.००% |
| ९ | लघुउद्योग(SME) कर्ज रु. १० लाखांपर्यंत कॅश क्रेडिट व टर्म लोन मुदत १ ते ७ वर्षापर्यंत | १२.००% |
| १० | शैक्षणिक कर्ज | १२.००% |
| ११ | सी. आर. ई. कर्ज | १८.००% |



पोस्टल रजि. नं. : SATARA/049/2020-21 Dt.17/01/2020 ई- प्रकाशन १५ डिसेंबर २०२१ MAHMAR/2010/31891

# घर तुमचं हक्काचं... तुमचं स्वतःचं...

# गृहप्रवेश

## गृहबांधणी/खरेदी कर्ज योजना

नवीन फ्लॅट खरेदीसाठी/घर बांधणीसाठी/जुना फ्लॅट/घर खरेदीसाठी
तुमच्या सध्याच्या घराच्या दुरूस्तीसाठी/विस्तारासाठी
एन. ए. प्लॉट खरेदी व बांधकाम दोन्हीसाठी

प्रति लाखास
₹ १२००/-

मुदत
१५ वर्षे

कमाल मर्यादा
₹. ५० लाख

**पात्रता :**
व्यावसायिक – वार्षिक उत्पन्नाच्या ४ पट
पगारदार – निव्वळ मासिक पगाराच्या ६० पट
शेती – वार्षिक उत्पन्नाच्या ४ पट

**उत्पन्न कागदपत्रे :**
व्यावसायिक – गत ३ वर्षांची आयकर विवरण पत्रके
पगारदार – पगारपत्रक, हमीपत्र
शेती – शेती उत्पन्नाची कागदपत्रे, बँक स्टेटमेंट

**आवश्यक कागदपत्रे :**
मिळकतीशी संबंधित अद्ययावत कागदपत्रे,
७/१२ उतारा, सिटी सर्वे उतारा,
मूल्यांकन अहवाल

**कायदेशी बाबी :**
शोध अहवाल, कायदेशीर मत
आर्थिकदृष्ट्या सक्षम २ जामीनदार
आर्थिक कागदपत्रांसहीत.



गाडी कोणतीही घ्या...
अर्थसहाय्य आम्ही करू...!

दुचाकी / चारचाकी वाहन खरेदीसाठी

# सुहाना सफर कर्ज योजना

प्रति लाखास
₹ २२२५/-

२४ तासात कर्ज उपलब्ध

100 %
पर्यंत कर्ज उपलब्ध





**आवश्यक कागदपत्रे :**
गाडीचे कोटेशन, मुल्यांकन रिपोर्ट

**आर्थिक कागदपत्रे :**
व्यावसायिक – गत ३ वर्षांची आयकर पत्रके
पगारदार – पगारपत्रक हमीपत्र
शेती – शेती उत्पन्नाची कागदपत्रे
आर्थिकदृष्ट्या सक्षम २ जमीनदार.



